# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग,

### मुख्य अभियंता,

### विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग,

### मुंबई.

## नागरिकांची सनद

सन-२०१८

# सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ३ ते ६ |
| २. | सा. बां. विभाग, (विशेष प्रकल्प) मुंबई कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ७ |
| ३. | विशेष प्रकल्प, सा.बां.विभागाची रचना | ८ |
| ४. | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ९ |
| ५. | विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | १० |
| ६. | विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | ११ |
| ७. | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सूचना. | १२ ते १३ |
| ८. | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | १४ |
| ९. | परिशिष्टे | १५ ते १८ |

## १. <u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाच्या १३३ वर्षाहून जास्त गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुख्य अभियंता विशेष प्रकल्प सा. बां. विभाग, हा गेल्या २६ वर्षापासुन यशस्वीपणे कार्यरत आहे. मुंबई, या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महानगरात मुख्यत्वे: करून सायन-पनवेल, पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्त्यावरून मुंबईमध्ये वाहतूक येते. सदरचे रस्ते या विभागाच्या अखत्यारित येतात. **मुंबईतील आरे, कुर्ला व वरळी या शासकीय दुग्धशाळांची दुरूस्ती करणे,** ***महाराष्ट्राच्या कोकणपट्टीचे सागराच्या आक्रमणापासून धुपप्रतिबंधक बंधारे बांधून किनारपट्टीचे संरक्षण करणे, राष्ट्रीय चक्रीवादळ प्रकल्पांतर्गत निवारा बांधणे, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणे हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांशी प्रकल्प राबविणे, रेल्वे विभागाच्या सहाय्याने रेल्वे ओलांडणी पुल बांधणे, तसेच रेल्वे व महाराष्ट्र शासन यांच्या समर्पित माल वाहतुक प्रकल्पांतर्गत ५०:५० समभागातून बांधण्यात येत असलेल्या रेल्वे उड्डाणपुलांच्या कामांचे सनियंत्रण करणे.***

सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई हे कार्यालय बांधकाम भवन, ४ था मजला, अे विंग, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ येथे कार्यरत असून मुंबई व कोकण किनारपट्टीतील नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी विशेष प्रकल्प सा.बां विभाग, मुंबई या सनदेद्वारे जाहिर करत असुन, ती स्विकारीत आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

१) मुंबई महानगरामध्ये प्रवेश करणाऱ्या मुंबईतील मुख्य वाहिन्या असलेल्या सायन-पनवेल महामार्ग सा.क्र.१४०/६९० ते सा.क्र.११५/८०० व पुर्व द्रूतगती महामार्गाची सा.क्र.५८४/७५० ते ५६१/२०० व पश्चिम द्रुतगती महामार्ग सा.क्र.५२२/६०० ते ५२७/६८० देखभाल दुरूस्ती, मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.

२) मुंबई शहर व उपनगरातील काही महत्वाच्या शासकीय इमारतींचे बांधकामे खात्याने ठरवलेल्या मानकानुसार उत्तम दर्जाची व सुरक्षीत अशी करणे. तसेच मुंबई शहर व उपनगरासाठी आवश्यक त्या ठिकाणी उड्डाण पुलांचा आराखडा निश्चित करून उड्डाणपुलाच्या आराखडयातील काही उड्डाण पुलांचे ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे सुबक बांधकाम करणे.

३) या विभागाच्या कार्यक्षेत्रातंर्गत असलेल्या दुग्धव्यवसाय, बंदर व मत्स्यव्यवसाय खात्याच्या इमारती, रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा व सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

४) महाराष्ट्राच्या कोकणपट्टीचे सागराच्या आक्रमणापासून धुपप्रतिबंधक बंधारे बांधून किनारपट्टीचे संरक्षण करणे, किनारपट्टीवर आवश्यक त्या ठिकाणी मच्छीमारी बंदरे, बोटी थांबण्यासाठी धक्के व मत्स्यव्यवसायासाठी सुविधा केंद्रे बांधणे.

५) राष्ट्रीय चक्रीवादळ प्रकल्पांतर्गत महाराष्ट्राच्या समुद किनारी निवारे बांधणे.

६) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गासाठी आवश्यक असलेल्या जमीनीचे भूसंपादन करून त्यावरील बाधितांचे पुनर्वसन करणे.

७) या विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पुर्व), मुंबई येथील संरक्षण भिंतीचे बांधकाम, दापचरी येथील धरणाचे काम, केंद्र शासनाचे टांकसाळ मुंबई इ. नियतकालिक देखभाल दुरूस्ती उपलब्ध निधीतून करणे.

८) रेल्वे विभागाच्या सहाय्याने रेल्वे ओलांडणी पुल बांधून रेल्वे वाहतुक फाटक मुक्त करणे. ***(समर्पित माल वाहतुक प्रकल्प व ५०:५० समभागातून राबविण्यात येणा-या प्रकल्पांचे संनियंत्रण)***

९) अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणे हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांशी प्रकल्प राबविणे.

१०) या विभागाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देंणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

११) या कार्यालयातील कामाशी संबंधीत प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

१२) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

१३) या कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या जाहिररित्या प्रदर्शित करणे.

१४) या विभागाच्या कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१५) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अखत्यारीतील मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत सक्षम स्तरावर त्वरीत कार्यवाही करणे.

१६) कार्यालयांच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागाच्या कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१७) संगणकीकरणाबाबत या विभागाच्या सर्व मंडळा- अंतर्गत विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

१८) या विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१९) सर्व विषयाची अनुसुची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

२०) कार्यालयांमध्ये सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

२१) विशेष राज्यमार्ग व द्रूतगती मार्गालगतच्या वेगवेगळया सेवावाहिन्यां टाकण्याची व त्याच्या दुरूस्तीसाठी परवानगी देणे. तसेच महामार्गालगत निवासी व व्यावसायिक स्वरूपाच्या बांधकामांना आवश्यक ते "ना-हरकत" प्रमाणपत्र देणे.

२२) महाराष्ट्रातील रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी महाराष्ट्र शासन व रेल्वे यांच्या मार्फत ५० : ५० या प्रमाणात खर्च करून बांधण्यात येणा-या रेल्वे ओव्हर ब्रिजच्या प्रस्तावांबाबत सा.बां.विभागाच्या वतीने समन्वयक (Co-ordinator) म्हणून काम पाहणे.

२३) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

- **विशेष प्रकल्प सा.बांविभाग कार्यालयाची बांधिलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना विशेष प्रकल्प सा.बां.विभाग, मुंबई.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे /ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

- **नागरिकांची जबाबदारी :-**

⇨ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

⇨ नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

⇨ विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पूरविण्याचा आग्रह धरु नये.

⇨ सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

⇨ नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

⇨ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.

⇨ नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

⇨ नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

३. **<u>विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई कार्यालयाची रचना.</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता विशेष प्रकल्प सा. बां. विभाग मुंबई कार्यालय शासनाने दि.२५/०९/१९८५ रोजी स्थापन केले आहे. विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई व किनारी अभियंता, बांद्रा मुंबई ही मंडळ कार्यालये असून त्यांचेकडे मुंबई शहर व उपनगरातील रस्ते, पूल व उड्डाणपूल, मुंबईतील दुग्धव्यवसाय प्रकल्प व निवासस्थाने तसेच मुंबई शहर व उपनगर जिल्हा, रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्र किनारपट्टी वरील बांधकामे व त्यांना जोडणारे रस्ते व बंदरे व मत्स्यव्यवसाय विभागाकडील अनिवासी व निवासी इमारती कार्यक्षेत्र येते. हया प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली एकूण १२ कार्यकारी अभियंता व ६१ उप अभियंता कार्यरत आहेत.

अधीक्षक अभियंता यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष - तक्ता (Tree- Chart ) परिशिष्ट "अ" म्हणून सोबत जोडला आहे.

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा ख-या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून अशी संबधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-याकडून केले जाते.

**४. विभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-**

मुंबई शहर व मुंबई उपनगरे / ठाणे / रायगड / रत्नागिरी व सिधुदूर्ग या जिल्ह्यातील हया विभागांतर्गत मुंबई शहर व उपनगरातील पश्चिम द्रुतगती महामार्ग, (अंशत:) पुर्व द्रुतगती महामार्ग व सायन-पनवेल महामार्ग व त्यावरील वाहिन्या, शासकीय दुग्धव्यवसायातील आरे-गोरेगाव, वरळी आणि कुर्ला दुग्धप्रकल्प व ७२०.०० कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टी येते. मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प विभागाची कार्यकक्षा दर्शविणारा नकाशा परिशिष्ट "ब" म्हणून सोबत जोडला आहे.

तसेच या विभागांतर्गत मुंबई - पुणे द्रूतगती मार्ग यांचे भूसंपादन व अनुषंगिक कामे येतात. पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागातील सर्व प्रकारची बांधकामे हाती घेण्यात येतात. तसेच अंशदान ठेव योजनेद्वारे इतर विभागासाठी आवश्यक असलेल्या इमारतींचीही बांधकामे हाती घेण्यात येतात. महाराष्ट्राच्या किनारपट्टीचे धुपप्रतिबंधक बंधारे बांधून संरक्षण करण्यात येते. तसेच किनारपट्टीवर आवश्यक त्या ठिकाणी मच्छीमारी बंदरे, बोटी थांबण्यासाठी धक्के व मत्स्यव्यवसायिकांसाठी सुविधा केंद्रे बांधण्यात येतात. तसेच अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक बांधण्याचा प्रकल्प प्रस्तावित आहे. तसेच रेल्वे विभागाच्या सहाय्याने रेल्वे ओलांडणी पुलाची बांधकामे करण्यात येतात.

**५. विभागातंर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.**

**अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक :-**

विशेष प्रकल्प सा.बां. विभाग, मुंबई कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती, तसेच रस्ते, पुल व इमारती आणि इतर कामांविषयीची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट "क" ) नमुद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन संबंधित विभाग कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गीक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभता :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**क) खाजगीकरण :-**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठ्या प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातुन उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासनस्तरावर ठरविले जाते.

या प्रादेशिक विभागांतर्गत सायन-पनवेल महामार्गाची सुधारणा करणेचे काम खाजगीकरणांतर्गत कार्यान्वित करण्यात आला असून सदरचा महामार्ग वाहतुकीस खुला आहे.

६. **<u>विशेष प्रकल्प सा. बां. विभाग, मुंबई कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता :-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी "अपघात निवारण समिती"' स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

अपघात निवारण समितीने विशेष प्रकल्प सा.बां. विभाग, मुंबई कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन प्रामुख्याने ३५ अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविली असुन, सर्व अपघात प्रवण स्थळांची सुधारणा प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात आली आहे. विशेष प्रकल्प सा.बां. विभाग, मुंबई अंतर्गत रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यात येत असुन त्यासाठी अतिशय गरजेच्या ठिकाणी रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी ओलांडणी पुल, पादचारी भुयारी मार्ग किंवा आवश्यक त्या ठिकाणी वाहतुकीचा भुयारी मार्ग बांधण्यात येत आहेत. तसेच जास्त वाहतुक वर्दळीच्या रस्त्यासाठी जास्त वाहतुकीचा दुसरा रस्ता ओलांड़त असेल तर उड्डाणपुलाची बांधणी करण्यात येत आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी रस्त्यावर तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक लावण्यात आले आहेत, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे

## ७. गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा, व जनसामान्यांची छाननी :-

### अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण :-

विभागाबाबत अथवा काही कामा बाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/ तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी. व मंडळ कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावी, तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे.

गा-हाणी समक्ष भेटीत /पत्राने वा "ई'' मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

### ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा विशेष प्रकल्प सा.बां. विभाग, मुंबई अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

## क) जनसामान्यांकडून सुचना

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत या प्रादेशिक विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दि.१ जून २००७ पासुन करण्यास प्रादेशिक विभाग कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया /अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

विशेष प्रकल्प सा.बां. विभाग, मुंबई खात्रीपुर्वक गुणवतेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया प्रादेशिक विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.


९. **<u>परिशिष्टे</u> :-**

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता
(Tree Chart)

ब) कार्यक्षेत्राचा नकाशा


**क) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

# परिशिष्ट - अ


मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सा.बां.विभाग, मुंबई.
सहा.मु.अभियंता (रस्ते)
सहा.मु.अ.(इमारती)
उप अभियंता (का-१)
उप अभियंता (का-२)
उप अभियंता (का-३)
विशेष अधीक्षक
अधीक्षक
अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर
किनारी अभियंता, सा.बां.मंडळ, बांद्रा, मुंबई.
कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई.
कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, कुर्ला, मुंबई.
कार्यकारी अभियंता, ठाणे खाडी पूल विभाग क्र.१, कोकण भवन, नवी मुंबई.
कार्यकारी अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र विभाग क्र.१, वडाळा, मुंबई.
कार्यकारी अभियंता, सा.बां.विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगांव, मुंबई.
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वरळी, मुंबई.
कार्यकारी अभियंता, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभाग, मुंबई.
पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उत्तर), कोकण भवन, नवी मुंबई.
पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी.
पत्तन अभियंता, सिंधुदुर्ग पत्तन विभाग, कुडाळ.
मुं.र.बां.उ.वि. क्र.१०, अंधेरी, मुंबई
मा.वि.उ.वि.क्र.१२, अंधेरी, मुंबई.
ब.इ.बां.उ.वि.क्र.३, बांद्रा, मुंबई.
ठा.खा.पू. उ.वि.क्र.१, बांद्रा, मुंबई.
मा.वि.उ.वि.क्र.१०, सांताक्रूझ, मुंबई.
ब.इ.बां.उ.वि.क्र.१, तुर्भे, नवी मुंबई
ब.इ.बां.उ.वि.क्र.२, कुर्ला, मुंबई.
मा.वि.उ.वि.क्र.८, तुर्भे, नवी मुंबई
मुं.र.बां.उ.वि.क्र.८, तुर्भे, नवी मुंबई
मुं.र.बां.उ.वि.क्र.९, कुर्ला, मुंबई
मा.वि.उ.वि.क्र.११, चेंबूर, मुंबई.
मुं.र.बां.उ.वि.क्र.७ तुर्भे, नवी मुंबई
ठा.खा.पू.उ.वि.क्र.२ तुर्भे, नवी मुंबई
ठा.खा.पू.उ.वि.क्र.४ तुर्भे, नवी मुंबई
ठा.खा.पू.दुरुस्ती व संनियंत्रण, कोकण भवन, नवी मुंबई.
मुं.र.वि.व.प्र. उ.वि.क्र.१, बांद्रा, मुंबई.
मुं.र.वि.व.प्र. उ.वि.क्र.२, बांद्रा, मुंबई.
मुं.र.वि.व.प्र. उ.वि.क्र.३, बांद्रा, मुंबई.
मुं.र.वि.व.स.चि. उ.वि.क्र.५, बांद्रा, मुंबई.
मुं.र.वि.व.स.चि. उ.वि.क्र.८, बांद्रा, मुंबई.
मुं.र.वि.व.स.चि. उ.वि.क्र.९, बांद्रा, मुंबई.
कृ.बां.उ.वि.१ आरे, गोरेगांव, मुंबई.
कृ.बां.उ.वि.९ दापचरी.
कृ.बां.उ.वि.१३ आरे, गोरेगांव, मुंबई.
सा.बां.उ.वि. चेंबूर मुख्यालय, कुर्ला, मुंबइ.
कृ.बां.उ.वि.१० वरळी, मुंबई
कृ.बां.उ.वि.११ वरळी, मुंबई.
कृ.बां.उ.वि.१५ कुर्ला, मुंबई.
छ.शि.म.स्मा.प्र. उ.वि.क्र.१, कुलाबा, मुंबई.
छ.शि.म.स्मा.प्र. उ.वि.क्र.२, कुलाबा, मुंबई.
छ.शि.म.स्मा.प्र. उ.वि.क्र.३, कुलाबा, मुंबई.
छ.शि.म.स्मा.प्र. उ.वि.क्र.४, कुलाबा, मुंबई.
प.उ.वि., अंधेरी
प.उ.वि., बांद्रा
प.उ.वि., ठाणे
प.उ.वि., अलिबाग
प.उ.वि., श्रीवर्धन
प.उ.वि., दापोली
प.उ.वि., भगवती बंदर, रत्नागिरी
खाण व सर्व्हेक्षण उ.वि रत्नागिरी
पाणलोट बंधारा उ.वि. रत्नागिरी
प.उ.वि. वाघोटन
प.उ.वि, मालवण
प.उ.वि, वेंगुर्ला
प.उ.वि, देवगड

# परिशिष्ट -ब

**मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प विभागाची कार्यकक्षा दाखविणारा नकाशा**



## परिशिष्ट - क
## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | शासन | ३० दिवस |
| २ | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ३ | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी व रस्त्याच्या बाजूला टाकण्यात येणा-या वाहिन्यांबाबत ना हरकत प्रमाणपत्र | शासन / मुख्य अभियंता | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ४ | रस्त्याच्या बाजूला जाहिरात फलक लावणेबाबत ना हरकत प्रमाणपत्र देणे | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ५ | रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |

(एन.एस.पालवे)
**मुख्य अभियंता**
**विशेष प्रकल्प, सा.बां.विभाग,**
**मुंबई करिता.**

<u>स्थळप्रत मुअ(विप्र) यांनी मंजूर केली आहे.</u>